Journal of Advances and Scholarly Researches in Allied Education
Vol. 13, Issue No. 2, July-2017, ISSN 2230-7540

# एलेन शोवॉल्टरप्रणीत “स्त्रीविशिष्ट अनुभव”: संकल्पना व उपयोजन

**Dr. Sheetal Pawaskar Bhosale***

Marathi Department, Ramchand Kimatram Talreja College of Arts, Science & Commerce, Ulhasnagar, Maharashtra

***सार – पुरुषकेंद्री (Androcentric) तत्त्वविचारातील मूल्यनिकषांपेक्षा वेगळे निकष मानणाऱ्या स्त्रीकेंद्री समीक्षापद्धतीची (Gynocentric Criticism) गरज निर्माण होणे, हा स्त्रीच्या आत्मशोधनाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. स्त्रीकेंद्री समीक्षेचा प्रारंभबिंदू म्हणून, व्हर्जिनिया वुल्फप्रणीत तात्त्विक भूमिकेकडे निर्देश केला जातो. आणि या समीक्षापद्धतीची सैद्धांतिक मांडणी करण्याचे श्रेय, अँग्लो-अमेरिकन स्त्रीवादी समीक्षक एलेन शोवॉल्टर यांना दिले जाते.***

---------------------------------x---------------------------------

एलेन शोवॉल्टरने क्रिटिकल एन्क्वायरी या नियतकालिकात फेमिनिस्ट क्रिटिसिझम इन विल्डरनेस हा लेख लिहिला आहे, शोवॉल्टरने या लेखात स्त्रीपुरुषांमधील फरक दाखविणारी एक सैद्धांतिक चौकट नमूद करून, स्त्रीवादी समीक्षेची तात्त्विक बैठक विकसित केली आहे. टूवर्डस् अ फेमिनस्ट पोएटिक्स[1] या निबंधात शोवॉल्टरने स्त्रीवादी समीक्षेचे ‘गायनोक्रिटिक्स’ (स्त्रीनिष्ठ समीक्षा) आणि ‘फेमिनिस्ट क्रिटिक’ (स्त्रीवादी चिकित्सा, स्त्रीवादी वाचन) असे दोन प्रकार नोंदविले आहेत.

एलेन शोवॉल्टरने मांडलेल्या “गायनोक्रिटिक्स” आणि “फेमिनिस्ट क्रिटिक” या संकल्पनांचा थोडक्यात परिचय करून घेऊ.

शोवॉल्टरप्रणीत “फेमिनिस्ट क्रिटिकष्या समीक्षापद्धतीत स्त्रीचा श्वाचक” (woman as a reader) म्हणून विचार केलेला दिसतो. प्रस्थापित सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक व्यवस्थांच्या संदर्भचौकटीत पुरुषलिखित साहित्यातील “स्त्रीत्वाश्ची संकल्पना दिग्दर्शित करणे, स्त्रियांना दिले गेलेले दुय्यमत्व, त्यांच्या वाट्याला येणारे शोषण अधोरेखित करणे व साहित्यकृतीतून व्यक्त होणारी पुरुषकेंद्री मूल्ये उघड करून दाखविणे, हे या समीक्षापद्धतीचे उद्दिष्ट आहे.

“गायनोक्रिटिक्स समीक्षापद्धती” स्त्रीचा ‘लेखक’ (woman as a writer) म्हणून विचार करते. लिंगभिन्नतेमुले प्राप्त झालेल्या स्त्रीविशिष्टतेचा शोध घेण्याची दिशा या समीक्षापद्धतीतून सूचित केली जाते. ही समीक्षापद्धती ‘स्त्रीचे खास स्त्रीविशिष्ट अनुभवविश्व असते’, या गृहीतकावर उभी आहे. ऋतूप्राप्ती व त्याचा शारीर, मानसिक अवस्थांतरणाशी असणारा जैविक संबंध, गर्भधारणेचा अनुभव, अपत्यसंगोपनातील स्तनपानासारखा शारीर-मानसिक देवघेवीचा अनुभव, रजोसमाप्तीचा अनुभव, हे स्त्रीशरीरनिष्ठ म्हणजे ‘स्त्रीविशिष्ट अनुभव’ (Female Experience) होत. स्त्रीविशिष्ट अनुभव व्यक्त करणाऱ्या साहित्याविषयी आणि या साहित्याचा अभ्यास करणाऱ्या समीक्षापद्धतीविषयी ज्येष्ठ समीक्षक प्राण् गंगाधर पाटील यांनी नमूद केलेले पुढील मत विचारात घेणे प्रस्तुत ठरेलण् ‘स्त्रीच्या अनुभवांचा अस्सलपणा हे या साहित्याचे श्रेष्ठ मूल्य मानले जातेण् या साहित्याला ‘स्त्रीविशिष्ट साहित्य’ (Female Text) असे म्हटले जाते. या साहित्याच्या समीक्षेला स्त्रीनिष्ठ साहित्यसमीक्षा (Gynocritics) असे म्हणतात.[2]

साहित्यातील स्त्रीविशिष्ट अनुभवांचा शोध घेताना, स्त्रीनिष्ठ समीक्षाप्रणीत मूल्यनिकषांचा आधार घेणे आवश्यक आहे, ही बाब उपरोक्त विवेचनावरून स्पष्टपणे अधोरेखित होते. मात्र साहित्यकृतीगत स्त्रीविशिष्ट अनुभवांचे, त्यामागील मूल्यदृष्टीसह विश्लेषण करायचे असेल तर, केवल स्त्रीनिष्ठ समीक्षेने सुचविलेले मूल्यनिकष पुरेसे आहेत का, असा प्रश्न उपस्थित होतो. साहित्यकृतीतून व्यक्त झालेल्या स्त्रीविशिष्ट अनुभवाचे शारीर पातलीवरील विशिष्टत्व गृहीत धरले तरी, साहित्यकृतीच्या लेखकाला, गर्भित लेखकाला, निवेदकाला व संबंधित पात्रांना या अनुभवाचा लागलेला अर्थ, अन्वयार्थ समाजरचित मूल्यचौकटींच्या संदर्भात असतो. हा अर्थ काही

www.ignited.in

वेला प्रस्थापित मूल्यांचे अनुसरण करणारा असतो तर काही वेला तो या मूल्यांना नाकारणाराही असू शकतो. साहित्यकृतीचा लेखक, निवेदक, पात्रे या दोन मूल्यभूमिकांपैकी कोणती भूमिका घेतातए या प्रश्नाचा वेध घेणे स्त्रीवादी समीक्षेत आवश्यक असते. आणि साहित्यकृतीचा असा वेध घ्यायचा असेल तरए समीक्षकाला ‘गायनोक्रिटिक्सष्मधील मर्मदृष्टींप्रमाणेच ‘फेमिनिस्ट क्रिटिकष्मधील मर्मदृष्टींचा आधार घेणे क्रमप्राप्त ठरते.

मराठी कथासाहित्यात कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, गौरी देशपांडे, सुनीती आफले, उर्मिला पवार, नीरजा, आदी स्त्रीकथाकारांनी ‘वाईल्ड झोन’ मधील स्त्रीविशिष्ट अनुभवांना कथेतून मोकली वाट करून दिली आहे.

प्रस्तुत लेखात सुनीती आफले यांच्या ओटी कथेतील स्त्रीविशिष्ट अनुभवाचे, ‘गायनोक्रिटिक्स’ व ‘फेमिनिस्ट क्रिटिकष्मधील मूल्यनिकषांच्या आधारे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

सुनीती आफले यांची ओटी कथा तृतीय पुरुषी आणि प्रथम पुरुषी निवेदनाच्या संमिश्र गुंफणीतून साकार झाली आहे. या कथेतील प्रोटोगोनिस्ट पात्र ४५-५०च्या दरम्यानचे वय असणाऱ्या तुंगाक्का असून, मेनॉपॉझच्या संदर्भातील स्त्रीविशिष्ट अनुभव कथेत साकार झाला आहे.

स्त्रीदेहात घडणाऱ्या अनेक नैसर्गिक घटनांपैकी ‘पाली येणे’ व ‘पाली जाणे’ या दोन महत्त्वाच्या घटना आहेत. ‘पाली येणे म्हणजे मुलीचे शरीर सृजनासाठी तयार होणे आणि पाली जाणे म्हणजे तिच्या शरीराची या संदर्भातील क्षमता संपणेष्ए हा या घटनांचा शास्त्रीय आणि नैसर्गिक संदर्भ आहे. पुरुषप्रधान व्यवस्था मात्र स्त्रीदेहाच्या या नैसर्गिक घडामोडींकडे ‘वंशवृद्धीसारख्या पुरुषधार्जिण्या व उपयुक्ततेतावादी दृष्टिकोनातून पाहते. या दृष्टिकोनामुले वंशवृद्धी करू शकणारा स्त्रीदेह उपयुक्त, आणि सृजनाची शक्यता संपलेला स्त्रीदेह अनुपयुक्तए असे पुरुषहितकेंद्री संकेत रूढ होतात. स्त्रीपुरुषांच्या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत कलतनकलतपणे हे संकेत त्यांच्या मनावर बिंबविले जातात. शरीरनिष्ठ नैसर्गिक संदर्भांकडे पुरुषधार्जिण्या संकेतचौकटीतून पाहण्याची सवय लागणेए ही याच सामाजिक प्रक्रियेची अपरिहार्य परिणती आहे.

प्रस्तुत कथेत तुंगाक्काच्या रजोसमाप्तीच्या कालातील अनुभव साकार झाला आहे. या कालात तुंगाक्कांना ब्लिडिंगचा प्रचंड त्रास होत असतोण् या त्रासातून सुटका करवून घ्यायची असेल तरए गर्भाशयाची पिशवी काढून टाकण्याचा एकमेव मार्ग आहेए असे डॉक्टरांनी तुंगाक्काला सुचविलेले असते. डॉक्टरांनी सुचविलेला हा मार्ग तुंगाक्काने केवल नाईलाजास्तव मान्य केलेला असतो. अर्थात हे मान्य करणे तुंगाक्कासाठी सोपे नसतेण् परिणामी, गर्भाशयाची पिशवी काढून टाकण्यासाठी ॲडमिट होताना आणि त्यानंतरही दीर्घ काल तुंगाक्का प्रचंड मानसिक उलथापालथीचा सामना करताना दिसतात. तुंगाक्काच्या मनातील ही भावनिक उलथापालथ ते शांतपणे सत्य स्वीकारीत ऑपरेशन थिएटरमध्ये निघालेली तुंगाक्का, या दरम्यानचा काल, या कथेतील प्रत्यक्ष काल आहे. याचा अर्थ, कथागत अवकाशातील काल हा मर्यादित आहे. मात्र निवेदकाने तुंगाक्काच्या आयुष्यातील “अवखल कुमारिका ते ४५-५० वयाच्या आसपासची प्रौढा”, अशा जवलपास तीस-पस्तीस वर्षांच्या कालातील अनेक स्त्रीविशिष्ट अनुभव (तुंगाक्काचे तीन वेलचे गरोदरपण, ॲबॉर्शन, क्युरेटिंग, सिझेरियन तसेच नैसर्गिक बालंतपण, इत्यादी इत्यादी) फ्लॅशबॅक तंत्राच्या माध्यमातून कथेत साकार केले आहेत. त्यामुले कथागत प्रत्यक्ष काल मर्यादित असूनही तुंगाक्काच्या स्त्री म्हणूनच्या दीर्घ कालीन प्रवासाचे संदर्भ कथेत साकार होतात.

तुंगाक्का स्त्रीदेहाशी संलग्न असणाऱ्या स्वतःच्या आयुष्यातील अनुभवांकडे पुरुषप्रधानसंस्कृतीने घडविलेल्या मूल्यचौकटीतून पाहताना दिसते. ‘स्त्री’ म्हणून आपल्याला गर्भारपण, बालंतपण यांसारखे ‘सृजनाचे सोहले’ जगता आले, ही तुंगाक्काच्या मनातील जाणीव, याच मूल्यसंस्कारांचे मूर्त रूप आहे. कथेतील स्त्रीविशिष्ट अनुभवाची दुसरी बाजू ‘स्त्रीत्व’ गमविण्याच्या टप्प्यावरील तुंगाक्काच्या अस्थिर मानसिकतेशी संबंधित आहे. तुंगाक्काची ही संदिग्ध मानसिकता पुढील संवादांतून स्पष्टपणे व्यक्त होते.

- ‘स्त्रीत्वाचे सारे अनुभव घेऊनही मनाला आज ही रिक्तता काघ्ण्ण्कशासाठीघ्ण्ण्काय हवंय आपल्याला आताघ् खरे तर रिकाम्या मनानं ए रिकाम्या हातानं आपण ऑपरेशन रूममध्ये जायला हवं’[3]
- ‘स्त्रीत्व संपवताना या स्त्रीत्वात गुरफटलेल्या, आयुष्यभर जोपासलेल्या खुळ्या, हलव्या भावना अशाच उफालून येत असतील काघ’[4]

विशिष्ट परिस्थितीत शरीराचा इतर कोणताही अवयव काढावा लागणे आणि गर्भाशयासारखा स्त्रीविशिष्ट अवयव काढावा लागणेए याकडे प्रस्थापित व्यवस्था वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहते. स्त्रीविशिष्ट अवयवांव्यतिरिक्त इतर कोणताही अवयव काढावा लागला, तर त्यात त्या स्त्रीचे तथाकथित ‘स्त्रीत्व’ पणाला लागलेले नसते. मात्र स्त्रीच्या शरीरातील गर्भाशय काढून

www.ignited.in

टाकणे म्हणजे तिच्या निर्मितीचे माध्यम संपवणे, पर्यायाने तिचे 'स्त्रीत्वश्च संपविण्यासारखे आहे, अशी पुरुषप्रधान व्यवस्थेची धारणा असते. तुंगाक्काच्या मानसिक आंदोलनांची सामाजिक संदर्भचौकट याच मूल्यधारणांनी घडविलेली दिसते,

तुंगाक्काने वयाच्या सतराव्या वर्षी भावी आयुष्याची स्वप्ने मनात बालगून भरतकाम केलेल्या चादरीए प्रस्तुत कथेत प्रतीकात्मक रूप धारण करतात. आपल्या वैवाहिक जीवनाचा प्रवास या चादरींच्या साक्षीने व्हावा, अशी तुंगाक्काची तीव्र इच्छा असते. या चादरींच्या सोबतीने तुंगाक्काला स्वतःचे 'स्त्री' म्हणून उमलणे, बहरणे अनुभवायचे असते. परंतु तुंगाक्काच्या मनातील हा तरल संदर्भ तीस वर्षांच्या वैवाहिक जीवनात, त्यांच्या नवऱ्याला कधीच कलत नाही. त्यामुले तुंगाक्काचे स्वप्न प्रत्यक्षात येतच नाही. उलटपक्षी, या चादरींच्या संदर्भात नवऱ्याचा कोरडा दृष्टिकोनच सातत्याने त्यांच्या अनुभवाचा विषय होत राहतो. त्यामुले या चादरींना त्यांच्या सहजीवनात कसलेच मोल प्राप्त होत नाही. मात्र तुंगाक्काच्या भावविश्वात या चादरींना अतिशय महत्त्वाचे स्थान असते. स्वतःचे स्त्रीत्व संपवताना तुंगाक्काला या चादरींची सोबत हवीशी वाटणे, हा याच भावनिक आस्थेचा अपरिहार्य भाग आहे. मात्र तुंगाक्काची ही भावनाही त्यांच्या नवऱ्याला कलत नाही.याचसंदर्भात, या चादरींप्रमाणे आपणही आयुष्यभर उपेक्षितच राहिलो, असा विचार तुंगाक्काच्या मनात चमकून गेल्याचे दिसते.

'स्त्री' म्हणून घडत. वाढत असताना नवऱ्याने आपली कधीच सोबत केली नाही, ही तुंगाक्काची खंत आहे. प्रथम पुरुषी निवेदनांतर्गत असणाऱ्या स्मृतिरूपातील घटनाप्रसंगांच्या माध्यमातून ही खंत कथेत साकारते. यापैकी एक प्रसंग तुंगाक्काच्या पहिल्या बालंतपणाच्या संदर्भातील आहे. तुंगाक्का बालंत झाल्यानंतर त्यांचा नवरा चार पाच दिवस त्यांना भेटायला येत नाही. या संदर्भात तुंगाक्कांनी, 'का नाही आलात लवकरघ्[5] एअसा प्रश्न अपेक्षेने विचारला असताना ष्माझं काय काम घ् आई आली होती नाघ्[6] एहे उत्तर मिलते. नवऱ्याचे हे उत्तर त्याच्या कोरड्या मानसिकतेवर प्रकाश टाकणारे आहे. वास्तविक पाहता, कोणत्याही स्त्रीसाठी बालंतपणाचा अनुभव हा शारीर पातलीवर पीडा देणारा अनुभव असतो. काही वेला तर या प्रसंगात स्त्रीला आपला जीवही गमवावा लागतो. त्यामुले हा अनुभव नव्या बालाच्या जन्माचा आणि बालाच्या आईच्या पुनर्जन्माचा अनुभव असतो. अशा प्रसंगी पत्नीसोबत उपस्थित राहून तिला शारीर-मानसिक आधार देणे हे पतीचे मूलभूत कर्तव्य असते. मात्र पुरुषांच्या या प्रकारच्या सहभागाचे महत्त्व लक्षात घेण्याचा प्रयत्न प्रस्थापित व्यवस्थेने केलेला दिसत नाही. व्यवस्थेच्या या सामाजिक भूमिकेचे व्यक्तिसापेक्ष अलिप्ततेच्या पातलीवरील मूर्त रूप म्हणजे तुंगाक्काच्या नवऱ्याचे वर्तन आहे. तुंगाक्काच्या नवऱ्याच्या वर्तनाचा हा संदर्भ तुंगाक्काच्या गर्भपाताच्या घटनेच्या निमित्तानेही कथेत साकार झाला आहे. गर्भपातानंतर रडू फुटलेल्या तुंगाक्काला, नवरा आपल्या पाठीवर मायेने हात फिरवेलए असे वाटत असते. असे वाटणे एक 'माणूस' म्हणून स्वाभाविकही आहे. मात्र या प्रसंगी तुंगाक्काच्या नवऱ्याने त्यांना ष्इतकं काय रडायचं त्यातघ्ण्ण्ण्मूल आहे ना एकघ् अन् पुढे होणार नाही का अजूनघ्ण्ण्ण्चूप![7] असे म्हणणे, हा संदर्भही येथे लक्षात घ्यायला हवा.

उपरोक्त छेदकात नमूद केलेल्या दोन्ही अनुभवांकडे पाहण्याचा तुंगाक्काचा आणि तिच्या नवऱ्याचा दृष्टिकोन परस्परांहून भिन्न असलेला दिसतो. या भिन्नत्वाचा संबंध काही प्रमाणात व्यक्तिसापेक्ष संवेदनशीलतेशी आहे, हे खरे आहे. मात्र पुरुषप्रधान व्यवस्थेतील 'स्त्री' आणि 'पुरुष' म्हणून घडण्यामागील मूल्यदृष्टीतही या भिन्न दृष्टिकोनाची मूले दडलेली आहेतए ही बाब अधोरेखित केली पाहिजे.

प्रस्तुत कथेचे सूत्र ज्या स्त्रीविशिष्ट अनुभवाशी निगडित आहेए त्यासंदर्भात 'नवरा' म्हणून तुंगाक्काला केलेली सोबत केवल कर्तव्यापुरती सीमित असलेली दिसते. याचाच एक भाग म्हणजे, तुंगाक्काच्या नवऱ्याने तिला हॉस्पिटलमध्ये आणून आपले पतिकर्तव्य निभावणे हा आहे. मात्र या कर्तव्यापलीकडे जाऊन तो आपल्या पत्नीच्या मानसिकतेचा विचार करताना दिसत नाही. परिणामी, स्वतःतील स्त्रीत्व संपणार म्हणून तुंगाक्काला आलेल्या रिक्ततेचा, गमावलेपणाच्या जाणिवेचा संदर्भ सख्यत्वाच्या भावनेने तुंगाक्काच्या नवऱ्याने समजून घेणे शक्य नाही. किंबहुना, या पातलीवर पत्नीला समजून घेता येऊ शकते, याची जाणीवही त्याला असलेली दिसत नाही. श्चल की अशी काय बसलीयेसघ् नवऱ्याचा चिडका सूर'[8] हा कथागत वास्तवातील संदर्भ यादृष्टीने लक्षणीय आहे. तुंगाक्काच्या भावविश्वात गहिरे स्थान असलेल्या चादरीच्या संदर्भातील प्रसंगही या संदर्भात विचारात घेता येईल. गर्भाशयाची पिशवी काढून टाकण्यासाठी हॉस्पिटलमध्ये आलेल्या तुंगाक्का त्यांनी घरून आणलेल्या 'त्या' विशिष्ट चादरी टेबलवर टाकतात. या प्रसंगी तुंगाक्काचा नवरा पत्नीचे त्या चादरींसोबत असणारे नाते लक्षात न घेताए 'हे कायघ् कशाला त्याघ् इथे तुझ्या ऑपरेशनसाठी आलोयण्ण्ण् हनिमूनसाठी नाहीय!'[9] अशा प्रकारे अतिशय कोरडेपणाने व्यक्त होतो. डॉक्टरांनी ऑपरेशन थिएटरमध्ये बोलावल्यावर श्चला डॉक्टरांनी बोलावलंय[10] असे त्यांच्या नवऱ्याने म्हणणे, आदी संदर्भ या दृष्टीने मुद्दाम लक्षात घ्यायला हवेत.

www.ignited.in

वास्तविक पाहता, तुंगाक्का आणि तिचा नवरा या दोघांचीही मानसिकता पुरुषकेंद्री मूल्यधारणांनी प्रभावित झालेली आहे. त्यामुले स्त्रीचे गर्भाशय काढावे लागणे म्हणजे तिचे स्त्रीत्व संपणे या संकेतचौकटीतूनच ही दोन्ही पात्रे या अनुभवांकडे पाहतात. तुंगाक्काचे पुरुषकेंद्री मूल्यांनी भारलेले वर्तन विशिष्ट संदर्भचौकटीत समजून घेणे शक्य आहे. तुंगाक्काचा नवरा मात्र पारंपरिक संदर्भचौकटीतील 'समंजस पुरुष' ज्या प्रकारचे वर्तन करेल, तसेही वर्तन करताना दिसत नाही. ज्या देहाने आपल्याला आनंद दिला, आपला 'वंश' वाढवला, त्या देहातील गर्भाशय आज त्या देहापासून विलग होणार, हा क्षण पारंपरिक मूल्यदृष्टी असलेल्या पुरुषासाठी भावनिकदृष्ट्या कठीण असणे स्वाभाविक आहे. आणि हे वर्तन विशिष्ट चौकटीत समजून घेता येणेही शक्य आहे. मात्र तुंगाक्काचा नवरा अशा कोणत्याच भावबंधांनी या अनुभवाशी जोडला गेलेला दिसत नाही. उलटपक्षी, तो अतिशय निर्विकारपणे, कमालीच्या अलिप्तपणे या अनुभवाकडे पाहताना दिसतो. मात्र तुंगाक्काच्या नवऱ्याच्या वर्तनातील हे निर्विकारपण व ही अलिप्तता पुरुषकेंद्री मूल्यांपासून मुक्त असण्यातून निर्माण झालेली नाही, ही बाब सावधपणे समजून घेतली पाहिजे.

प्रारंभीच्या टप्प्यावर नमूद केल्याप्रमाणे प्रस्तुत कथा तृतीय आणि प्रथम पुरुषी निवेदनातून साकार होते. त्यामुले तुंगाक्काच्या आयुष्यात घडणाऱ्या काही घटनांचे सूचन करीत कथानक पुढे नेले जाते. निवेदनाची सूत्रे जेव्हा तुंगाक्काच्या हातात जातात तेव्हा तुंगाक्काच्या गतायुष्यातील अनेक संदर्भ तुंगाक्काच्या दृष्टिकोनातून कथावकाशात प्रवेश करतात. त्यामुले तृतीय पुरुषी निवेदक आणि तुंगाक्काच्या रूपातील प्रथम पुरुषी निवेदक, या दोघांच्या परिप्रेक्षातून कथा गतिमान होत जाते. तुंगाक्काला हॉस्पिटलमध्ये भेटलेल्या अनेक अपरिचित स्त्रियांचे कथेत साकारलेले स्त्रीविशिष्ट अनुभवए हे याच गतिमानतेचे मूर्त रूप आहे. तुंगाक्काशी कोणत्याही प्रकारचा परिचय नसलेल्या या स्त्रिया विविध वयोगटांतील आहेत. त्यामुले त्यांच्या अनुभवाचा विषय असलेले स्त्रीविशिष्ट अनुभवही भिन्न स्वरूपाचे आहेत. कुणी नुकतीच ओकाऱ्यांच्या त्रासानं बेजार झालेलीण्ण्कुणी अनुभवी गर्भारपण गोंजारीत बसलेली ण्ण्कुणाचं अर्धवट झालेलंण्ण्कुणाचं बाल जन्मला आलेलं[11] हा कथांतर्गत वास्तवातील संदर्भ या दृष्टीने बोलका आहे. स्त्रीविशिष्ट अनुभवांचे व्यक्तिनिहाय संदर्भ भिन्न असले तरी, 'स्त्रीविशिष्टत्व' या एका समान सूत्राने तुंगाक्का आणि अन्य स्त्रिया काही कालासाठी एकमेकींशी जोडल्या जातात.

कथेच्या उत्तरार्धात तुंगाक्काच्या मुलीची मैत्रीण तुंगाक्काला भेटते, असा प्रसंग साकार झाला आहे. नववा महिना लागलेल्या या मुलीच्या मैत्रिणीच्या पोटात अजिबात दुखत नसते. पण लिकिंग सुरू झाल्यामुले ती हॉस्पिटलमध्ये दाखल होते. तिच्या तोंडी असलेलाए कसं असतं नैघ् आपलं म्हणून उरीपोटी वागवायचंआपल्याच रक्तावर पोसायचं. ते मूर्त रूपात केव्हा दिसणार हे मात्र आपल्या हाती नाहीय.!'[12] हा संवाद, स्त्रीचा स्वदेहातील अनेक शक्यतांपासून असणारा नैसर्गिक दुरावा अधोरेखित करतो.

कथेच्या शेवटी तुंगाक्का आयुष्यभर जपलेल्या चादरी 'स्त्रीत्वाच्या भाराने सजलेल्या' मालतीच्या (मुलीच्या) मैत्रिणीला देतात. याप्रसंगी तुंगाक्काच्या मनात निर्माण झालेल्या दोन प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे:

### पहिली प्रतिक्रिया

- त्रीत्वाच्या उंबरठ्यात नुकतीच डोकावलेली ही कला.अजून त्यातली वेगवेगली दालनंत्यातले उजेड-अंधारत्यातली सजावट अन् कोलीष्टकंत्यातले पडदे अन् उघडे कोनाडेकाही काहीच तर पाहिलं नाही हिनं. अन् सगलं पाहूनग्राहूनभोगून.आता या वास्तूचं दार कायमचं बंद करून निघून जाणाऱ्या आपण."[13]

### आणि दुसरी प्रतिक्रिया

- 'तेव्हा मी कशी असेनघ् स्त्रीत्व संपलेली. अशा स्त्रीनं दुसऱ्या स्त्रीची ओटी भरायची असते कि नैघ[14]

तुंगाक्काच्या मनातील या दोन्ही प्रतिक्रिया त्यांच्यावर असणाऱ्या पारंपरिक मूल्यसंस्काराचे प्रत्यक्ष रूप आहे. कथागत प्रथम पुरुषी निवेदक अर्थात तुंगाक्का एका बाजूला पुरुषप्रधान संस्कृतीत 'स्त्री' म्हणून सार्थकत्व देणारे अनुभव उदात्तीकरण करत मांडतात. तर दुसरीकडे स्वतःच्या पुरुषाचे मात्र या संदर्भात अलिप्त राहणे आणि त्यामुले त्यांच्या वाट्याला आलेले दुर्लक्षितपणाचे दुःख अधोरेखित करतात. हे सगले करीत असताना निवेदक कुठेही 'माणूस' म्हणून स्वतःचा विचार करताना दिसत नाही. तुंगाक्काच्या स्वतःच्या नवऱ्याकडून असलेल्या अपेक्षाही 'मैत्रभावाच्या दिशेने विकसित झालेल्या दिसत नाहीत. दुसरे असे की, प्रथम पुरुषी निवेदनातून साकार झालेल्या कथ्यातील पारंपरिक मूल्यदृष्टीला छेद देण्याचा प्रयत्न तृतीय पुरुषी निवेदनातून घडताना दिसत नाही. त्यामुले तृतीय पुरुषी निवेदकही प्रस्थापित मूल्यचौकटीतूनच या अनुभवविश्वाकडे पाहतो, असे दिसते. कथानकातील पात्रांची, दोन्ही निवेदकांची आणि कथ्याची संरचना करणाऱ्या गर्भित लेखकाचा, मूल्यात्मक पातलीवरील वेगला आवाज कथागत अवकाशात उमटत नाही. परिणामी, या कथेचा गर्भित लेखकही

www.ignited.in

पारंपरिक मूल्यचौकटीशी नाते सांगणारा आहे, असे म्हणावे लागेल.

## संदर्भ

1. Elaine showalter, “Towards a Feminist - Poetics”, ‘Women Writing and Writing about Women’, Mary Jacobus (Editor), Harper and Row Publishers, Usa, Pg. 25. http: //www.scribd.com/-doc/750-52479/.

2. गंगाधर पाटील, स्त्रीवादी साहित्यसमीक्षा, अनुष्टुभ, सप्टेंबर-ऑक्टोबर, 1996, पृ. 4. 5.

3. सुनीती आफले, ओटी, अनाथ, मेनका प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, 1981, पृ. २७

4. तत्रैव.

5. तत्रैव, पृ. ३२.

6. तत्रैव.

7. तत्रैव.

8. तत्रैव, पृ. २८.

9. तत्रैव, पृ. २९.

10. तत्रैव, पृ. ३४.

11. तत्रैव, पृ. २६.

12. तत्रैव, पृ. ३४.

13. तत्रैव.

14. तत्रैव.

**Corresponding Author**

**Dr. Sheetal Pawaskar Bhosale***

Marathi Department, Ramchand Kimatram Talreja College of Arts, Science & Commerce, Ulhasnagar, Maharashtra